लोकमत

# नवे विभाग, संयुक्त अभ्यासक्रम सुरू करा

## विज्ञान-तंत्रज्ञान विद्याशाखा : नॅक समितीकडून शिवाजी विद्यापीठाला विविध सूचना

**संतोष मिठारी**
लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** अध्यायन, अध्यापन व मूल्यमापन, अभ्यासक्रम, संशोधन आणि विस्तार, आदींचे कौतुक, प्रशंसा करीत राष्ट्रीय मूल्यांकन तथा प्रत्यायन परिषदेने (नॅक) शिवाजी विद्यापीठाला 'ए-प्लस प्लस' असे राज्यातील सर्वोच्च मानांकन दिले. मात्र, त्यासह बदलत्या तंत्रज्ञानाचा वेध घेऊन विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेत नव्या अभ्यासक्रमांचे विभाग सुरू करावेत. परदेशातील विद्यापीठांसमवेत करार करून त्यांच्या सहकार्याने संयुक्त अभ्यासक्रम राबवावेत, अशा विविध सूचना करीत विद्यापीठाला पुढील वाटचालीचा मार्ग दाखवून दिला आहे.

नॅक मूल्यांकन समितीने दि. १५ ते १७ मार्चदरम्यान विद्यापीठाला भेट दिली. या चौथ्या पुनर्मूल्यांकनाच्या प्रक्रियेच्या समारोपप्रसंगी झालेल्या 'एक्झिट मीटिंग'वेळी या समितीने त्यांचा अहवाल विद्यापीठाला दिला होता. विद्यापीठाने गुरुवारी हा अहवाल जाहीर केला. त्यामध्ये विविध सात सूचना केल्या आहेत. त्यात नवीन शैक्षणिक धोरणाअंतर्गत आंतरविद्याशाखीय केंद्रे सुरू करावीत. विद्यापीठाने त्यांच्या कार्यक्षेत्रात ग्रामदत्तक योजना राबवून ग्रामविकासाला पाठबळ द्यावे. सामाजिक आणि मानव्यशास्त्र विषयांमधील संशोधन प्रकल्पांचे प्रमाण वाढवावे. विद्यापीठातील ॲड-ऑन अभ्यासक्रमाच्या प्रवेशजागा शंभर टक्के भरण्याबाबतची कार्यवाही करावी. शासनाने विद्यापीठातील रिक्त पदे तातडीने भरण्यास परवानगी द्यावी यांचा समावेश आहे.

### 'नॅक'ने केलेली प्रशंसा

**अभ्यासक्रम :** कार्यक्षेत्रातील गरजा ओळखून अभ्यासक्रमांची रचना. अभ्यासमंडळांवर औद्योगिक क्षेत्रातील प्रतिनिधित्व. आऊट कम बेसड् एज्युकेशन

**अध्यापन, मूल्यमापन पद्धती :** विद्यार्थीस्तर लक्षात घेऊन त्यांच्यासाठी अध्यापन पद्धतीचा विकास. विविध परीक्षांमधील विद्यार्थ्यांची कामगिरी.

**संशोधन आणि विस्तार :** संशोधनाला बळ देणाऱ्या सुविधा. देशपातळीवर ठसा उमटविणारे विविध पाच विभाग. शिक्षकांना मिळालेली फेलोशिप, पेटंट.

**विद्यार्थ्यांना पाठबळ :** ४६ टक्के विद्यार्थ्यांना शासकीय, तर १४ टक्के विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती. कमवा व शिका योजना. प्लेसमेंट सेल, आंतरराष्ट्रीय विद्यार्थी कक्षाची कामगिरी.

**प्रशासन :** बृहत आराखड्यानुसार वाटचाल. विविध अधिकार मंडळांचे योग्य पद्धतीने काम. राखीव निधीची तरतूद.

**विविध उपक्रम :** विद्यार्थी सुरक्षा, जलसंवर्धन, हरित परिसर, सांडपाणी, कचरा व्यवस्थापन, एनएसएसचे उपक्रम.

**पायाभूत सुविधा :** इमारती, सभागृह, अंतर्गत रस्ते उत्तम. अद्ययावत डाटा सेंटर, संपन्न ग्रंथालय, माहिती तंत्रज्ञानाचा चांगला उपयोग.



नॅक समितीने प्रशंसा केलेल्या मुद्द्यांच्या अनुषंगाने विद्यापीठाच्या क्षमता अधिक विकसित केल्या जातील. केलेल्या सूचना विचारात घेऊन, कृती आराखडा तयार करण्यात येईल.

- डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू.

अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाची (आयक्यूएससी) कामगिरी रोल मॉडेल ठरणारी आहे. या कामगिरीमुळे विद्यापीठाने गुणवत्तेच्या मापदंडामध्ये आगेकूच केली असल्याचे या समितीने नोंदविले आहे.

सकाळ

# विद्यापीठांच्या परीक्षा ऑनलाइन

## उदय सामंत ; अठरा वर्षांवरील विद्यार्थ्यांचे लसीकरण होणार



उदय सामंत

मुंबई, ता. २२ : राज्यातील सर्व विद्यापीठांच्या परीक्षा सध्याच्या परिस्थितीत ऑफलाइन घेणे शक्य नाही, त्यामुळे त्या ऑनलाइन घेतल्या जातील आणि १८ ते २५ वर्षे वयोगटातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे लसीकरण केले जाईल, अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी आज मुंबईत पत्रकारांशी बोलताना दिली.

राज्यात कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव पाहता अठरा वर्षांपेक्षा अधिक वय असणाऱ्या सर्वांना १ मेपासून लस दिली जाणार असून याच पार्श्वभूमीवर विद्यापीठ व महाविद्यालयातील तब्बल ३६ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांचे लसीकरण केले जाईल, असेही त्यांनी सांगितले. राज्यातील विद्यापीठ आणि वरिष्ठ महाविद्यालयांत किती विद्यार्थी शिक्षण घेत आहेत, याचा आढावाही घेण्यात आला असून, त्याप्रमाणे हे लसीकरण केले जाणार असल्याचे सामंत म्हणाले. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सामंत यांनी आज राज्यातील अकृषि विद्यापीठांच्या सर्व कुलगुरूंसोबत परीक्षांबाबत दूरदृश्यप्रणालीच्या माध्यमातून संवाद साधला. यावेळी, सर्वच विद्यापीठांना यापुढे आपल्या परीक्षा या ऑनलाइन पद्धतीने घ्याव्यात अशा सूचना देण्यात आल्या असल्याचे त्यांनी नमूद केले.

### पंधरा दिवसांत निर्णय

यंदाचे शैक्षणिक वर्ष वेळेत सुरू करण्यात येणार असून, याबाबत येत्या १५ दिवसांत निर्णय घेण्यात येईल. सर्व परीक्षा घेत असताना एकही विद्यार्थी कोरोनाबाधित होणार नाही, याची विशेष काळजी घेण्यात येईल. विद्यार्थ्यांचे आरोग्य हे सर्वांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे, असेही सामंत यांनी सांगितले.

Kolhapur, Main
23/04/2021 Page No. 1

23 APR 2021

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ऑनलाईनमध्ये विद्यापीठाचे एक पाऊल पुढे

## निम्याहून अधिक विषयांच्या परीक्षा संपल्या : उर्वरीत विषयांच्या परीक्षा ऑनलाईन होणार

प्रतिनिधी
कोल्हापूर

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी राज्यातील १३ आकृषी विद्यापीठाच्या ऑनलाईन परीक्षा घेणार असल्याचे जाहीर केले आहे. परंतू शिवाजी विद्यापीठाच्या २२ मार्चपासून पदवी, पदव्युत्तर आणि व्यवसायिक अभ्यासक्रमाच्या ऑनलाईन परीक्षा सुरू आहेत. आतापर्यंत निम्याहून अधिक परीक्षा पार पडल्या आहेत. या निर्णयानंतर ऑफलाईन पध्दतीने परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसह उर्वरीत विषय आणि पदवी प्रथम वर्षाच्याही परीक्षा ऑनलाईन पध्दतीने होणार आहेत. त्यामुळे शिवाजी विद्यापीठ ऑनलाईन परीक्षेत एक पाऊल पुढे आहे, आसे म्हंटले तरी वावगे ठरणार नाही.

राज्यभरात १३ आकृषी विद्यापीठ आहेत. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर ऑनलाईन आणि ऑफलाईन दोन्ही पध्दतीने परीक्षा घेतल्या जात आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना दोन्ही ऑपशन निवडण्याची संधी देण्यात आली होती. यात ८५ टक्के विद्यार्थ्यांनी ऑनलाईन तर १५ टक्के विद्यार्थ्यांनी ऑफलाईनचा ऑपशन निवडला होता. सध्या कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत असल्याने विद्यापीठ परीक्षांमध्ये एकसुत्रीपणा यावा म्हणून सर्वच आकृषी विद्यापीठांच्या परीक्षा ऑनलाईन



पध्दतीने घेण्याचा निर्णय मंत्री सामंत यांनी घेतला आहे. शिक्षणमंत्र्यांच्या निर्णयानुसार आता शिवाजी विद्यापीठातील सर्वच परीक्षा ऑनलाईन होणार आहेत. पदवी प्रथम वर्षाच्या परीक्षाही ऑनलाईन पध्दतीने घेण्याच्या सूचना आज (दि. २३) विद्यापीठ प्रशासनाकडून महाविद्यालयांना दिल्या जाणार आहेत, अशी माहिती शिवाजी विद्यापीठ परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी दिली.

### अडीच लाख विद्यार्थ्यांची माहिती उच्च शिक्षण विभागाला देणार

देशातील १८ वर्षावरील सर्व लोकांना कोरोना लस देण्याचा निर्णय केंद्र सरकारने जाहीर केला आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्वच विद्यापीठातील १८ वर्षावरील विद्यार्थ्यांचा डेटा उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालयाने मागवला आहे. त्यामुळे शिवाजी विद्यापीठातील २ लाख ५७ हजार विद्यार्थ्यांचा डेटा उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालयाला दिला जाणार आहे. त्यामध्ये विद्यार्थ्याचे नाव, फोन नंबर, ईमेल आयडी, वर्ग यासह सर्व माहिती असेल.

### 'त्या' १७ हजार विद्यार्थ्यांना द्यावी लागणार ऑनलाईन परीक्षा

विद्यापीठ अंतर्गत पदवी, पदव्युत्तर, व्यवसायिक अभ्यासक्रमाच्या १७ हजार विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी ऑफलाईन ऑपशन निवडला होता. कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्यानंतर सोयीनुसार ऑफलाईन परीक्षा घेण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला होता. आता राज्य शासनाच्या निर्णयानुसार या विद्यार्थ्यांना ऑनलाईन परीक्षेचा ऑपशन निवडण्यासाठी वेळ दिला जाणार आहे. सध्या सुरू असलेल्या परीक्षा संपल्यानंतर ऑफलाईनमधील १७ हजार विद्यार्थ्यांसह तांत्रिक अडचणीमुळे परीक्षा देवू न शकलेल्या सर्वच विद्यार्थ्यांच्या परीक्षा ऑनलाईन पध्दतीने होतील.

उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांची घोषणा

# सर्व १३ विद्यापीठांच्या परीक्षा आजपासून ऑनलाईन होणार

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील कृषी वगळता अन्य १३ विद्यापीठांच्या परीक्षा शुक्रवारपासून केवळ ऑनलाईन पद्धतीने घेतल्या जातील, असे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी जाहीर केले आहे.

या विद्यापीठांच्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन आणि ऑफलाईन असे पर्याय देऊन विद्यापीठांना त्यासंदर्भात निर्णय घेण्यास सांगण्यात आले होते. त्यानुसार काही विद्यापीठांनी ऑनलाईन परीक्षा सुरू देखील केल्या होत्या. मात्र, आता सर्वच्या सर्व १३ अकृषी विद्यापीठांना ऑनलाईन परीक्षा घेण्याच्या सूचना राज्य सरकारने दिल्या आहेत. नव्या निर्बंधांमुळे विद्यार्थ्यांना घराबाहेर पडणे कठीण झाल्याने हा निर्णय सर्वानुमते घेण्यात आल्याचे सामंत यांनी सांगितले. या परीक्षा घेताना विद्यार्थ्यांना काही तांत्रिक अडचणी आल्यास त्याची पूर्तता करण्याच्या सूचना सर्व १३ विद्यापीठांच्या कुलगुरूंना केली असून या परीक्षांमधून कोणतेही विद्यार्थी वंचित राहणार नाहीत, याची दक्षता या विद्यापीठांना घेण्यास सांगण्यात आल्याचे सामंत म्हणाले.

**आजपासूनच ऑनलाईन परीक्षा**

हा निर्णय शुक्रवारपासूनच लागू होईल, असे सामंत यांनी सांगितले. सर्वच विद्यापीठांमध्ये पान ६ वर

## शिवाजी विद्यापीठाच्या ७९,५०० विद्यार्थ्यांना दिलासा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे शिवाजी विद्यापीठाच्या पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या ७९ हजार ५०० विद्यार्थ्यांच्या परीक्षा ऑनलाईन होणार आहेत.



कोरोनामुळे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी राज्यातील सर्व विद्यापीठाच्या उर्वरित सर्व परीक्षा ऑनलाईन घेण्याचा निर्णय गुरुवारी घेतला. शिवाजी विद्यापीठाच्या वतीने महाविद्यालय स्तरावर घेतल्या जाणाऱ्या बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., बीबीए, बीसीए, बीसीएस, बी.व्होक. अभ्यासक्रमांच्या पान ६ वर

लोकमत

# प्रथम वर्षाच्या परीक्षा ऑनलाइन होणार

## परीक्षा नियोजन समितीची बैठक : संलग्नित महाविद्यालयांवर जबाबदारी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोरोनाचा प्रादुर्भाव वाढू लागल्याने शिवाजी विद्यापीठाच्या द्वितीय, तृतीय वर्षापाठोपाठ आता पदवी प्रथम वर्षाच्या परीक्षा देखील ऑनलाइन होणार आहेत. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील संलग्नित २७६ महाविद्यालयांवर या परीक्षांची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. या परीक्षा घेण्याची दि. १५ मेपर्यंत असणार आहे. त्याबाबत विद्या परिषदेच्या सदस्या डॉ. मेघा गुळवणी यांच्या अध्यक्षतेखालील परीक्षा नियोजन समितीची ऑनलाइन बैठक गुरुवारी सायंकाळी झाली.

या बैठकीत बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी., बीबीए., बीसीए., बीसीएस आदी अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाच्या परीक्षा ऑनलाइन घेण्याचा निर्णय झाला. त्याबाबतची शिफारस या समितीने विद्यापीठ प्रशासनाला केली. यापूर्वी विद्यापीठाने संलग्नित महाविद्यालयांनी दि. २२ मार्च ते २२ एप्रिलदरम्यान प्रथम वर्षाच्या परीक्षा ऑनलाइन अथवा ऑफलाइन स्वरूपात घेण्याची सूचना केली होती. त्यानुसार दि. ५ एप्रिलपासून परीक्षा घेण्याची बहुतांश महाविद्यालयांनी तयारी केली होती. मात्र, परीक्षा नियोजन समितीच्या निर्णयामुळे या महाविद्यालयांना त्यामध्ये बदल करावा लागणार आहे. ऑनलाइन स्वरूपात परीक्षा घेण्यासाठी महाविद्यालयांनी त्यांच्या पातळीवर संगणक प्रणाली निवडायची आहे.

Kolhapur Main
Page No. 3 Apr 23, 2021
Powered by: erelego.com

# सर्व १३ विद्यापीठांच्या परीक्षा आजपासून ऑनलाईन होणार

(पान १ वरून) परीक्षा सुरू असून काही ठिकाणी अपवादात्मक परिस्थितीत ऑफलाईन परीक्षा घेण्यात आल्या आहेत. मात्र, उद्यापासून त्या शक्य नसल्यामुळे सर्वच कुलगुरूंनी सरकारला विनंती केल्यानुसार आजच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आलेला आहे. कोणत्याही विद्यार्थी किंवा विद्यार्थिनीचे शैक्षणिक नुकसान होणार नाही याची काळजी विद्यापीठांनी घ्यायची आहे. या परीक्षांमध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय अशा सर्वच वर्गांच्या परीक्षांचा समावेश असेल, अशी माहिती त्यांनी दिली.

**३७ लाख विद्यार्थ्यांना होणार फायदा**

राज्यातील विद्यापीठात १८ ते २५ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांची संख्या ३७ लाख इतकी आहे. ज्यामध्ये गोंडवाना विद्यापीठ ८४ हजार, रामटेक विद्यापीठ १७ हजार, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर ३ लाख ६ हजार, बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ४ लाख ५० हजार, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ १ लाख ६५ हजार, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ ६ लाख ५० हजार, मुंबई विद्यापीठ ७ लाख १० हजार, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर २ लाख ५७ हजार, कवी बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ १ लाख १५ हजार, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ १ लाख ७० हजार, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ २ लाख २०, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ २ लाख ५० हजार, एसएनडीटी विद्यापीठ ४५ हजार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे ५५ हजार आणि कला संचालनालय ६ हजार असे एकूण ३७ लाख इतकी विद्यार्थी संख्या आहे.

सकाळ

# ‘स्टोरीटेल’, ‘ई-बुक्स’ना वाढणार मागणी

## जागतिक पुस्तक दिनी विविध ऑनलाईन उपक्रमांवरच भर

**» जागतिक पुस्तक दिन विशेष**

कोल्हापूर, ता. २२ : संचारबंदी आता अधिक कडक होत असताना ‘स्टोरीटेल’ आणि ‘ई-बुक्स’ना पुन्हा मागणी वाढणार आहे. नव्या पिढीचा या माध्यमांकडे अधिक कल असून गोष्टी वाचण्याबरोबरच ऐकण्यावर भर दिला जाणार आहे.

२३ एप्रिल हा जागतिक पुस्तक दिन. जगप्रसिद्ध साहित्यिक शेक्सपिअरचा जन्म आणि मृत्यूदिनही. यानिमित्ताने जगभर वाचन संस्कृतीवर विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.



यंदा कोरोनामुळे जाहीर कार्यक्रम फारशे होणार नसले तरी ऑनलाईन माध्यमातून वाचनसंस्कृतीवर जरूर चर्चा होणार आहे. या पार्श्वभूमीवर या क्षेत्रातील तज्ज्ञांशी संवाद साधल्यानंतर ‘स्टोरीटेल’ आणि ‘ईबुक्स’ना मागणी वाढणार असली तरी ती तत्कालीक असेल, अशा प्रतिक्रियाही व्यक्त झाल्या.

संचारबंदीमुळे सर्व पुस्तकालये, ग्रंथदालने बंदच आहेत. त्यामुळे ऑनलाईन पुस्तके कुणी मागवली तरी त्यांना ती पाठवणे शक्य होणार नाही. विविध ॲप्स आली असली तरी प्रत्यक्ष पुस्तके वाचण्याचा अनुभव वेगळाच असतो. त्याशिवाय मोबाईल, टॅबवर पुस्तके ऐकणे किंवा वाचल्यामुळे डोळ्यांचे विकारही वाढतात. या पार्श्वभूमीवर मुद्रित पुस्तकांची मागणी संचारबंदीनंतर पुन्हा नक्की वाढणार आहे.

## पुस्तके देतात प्रेरणा अन् जीवनाला आकारही...

जागतिक पुस्तक दिनाच्या निमित्ताने प्रशासनातील प्रमुख अधिकाऱ्यांनी ‘पुस्तके प्रेरणा देतात. जीवनाला आकार देतात..’ असे आवर्जुन सांगितले.

**“ चौफेर वाचनावर पहिल्यापासूनच भर दिला आहे. प्रत्येक पुस्तकातून मी काही ना काही शिकतो. एखादे विशिष्ट पुस्तक टर्निंग पॉईंट ठरले, असे सांगता येणार नाही. ‘वपुर्झा’ असेल ‘सत्याचे प्रयोग’ असतील किंबहुना सानेगुरुजी, रघुनाथ माशेलकर, सुधा मूर्ती, नंदन नीलकेणी अशा अनेक दिग्गजांची पुस्तके आजवर वाचली आहेत. प्रत्येक पुस्तकातून नक्कीच नवी दिशा मिळते.**

- **डॉ. डी. टी. शिर्के**, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

**“ महिन्याला दोन नवीन पुस्तके वाचतो. अनुभव कथित करणारी व थोरांच्या अनुभवावर आधारित पुस्तकातून प्रेरणा मिळते. पुस्तक हेच गुरू आहेत. वाचनातून विचार क्षमता, कल्पकता वाढून तुम्ही प्रगल्भ, अनुभव संपन्न होता. त्याचा उपयोग आयुष्यभर होतो. ‘महानायक’, ‘पानिपत’, ‘श्रीमानयोगी’ ही भावलेली पुस्तके आहेत.**

- **शैलेश बलकवडे,** जिल्हा पोलिस अधीक्षक

**“ शिवाजीराव सावंत यांचे ‘मृत्युंजय’ हे माझे सर्वाधिक आवडते पुस्तक आहे. आमच्या पिढीला पुस्तकांनी अधिक समृद्ध केले. नव्या पिढीनेही पुस्तकांची कास धरावी. अलीकडच्या काळात ‘स्टोरीटेल’, ‘ई-बुक्स’चा ट्रेंड आहे. मात्र, जगणं अधिक समृद्ध करणारी पुस्तकं आपल्या संग्रही असावीत. कधीही आणि कुठेही, कुठल्याही परिस्थितीत ती नक्कीच मार्गदर्शक ठरतात.**

- **अजयकुमार माने,** प्रभारी, मुख्य कार्यकारी अधिकारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

23 APR 2021

तरुण भारत

# विद्यापीठ परीक्षा ऑनलाईन

## उच्च शिक्षण मंत्री उदय सामंत यांची घोषणा : तांत्रिक अडचणी निवारणाची विद्यापीठांना सूचना

प्रतिनिधी
मुंबई

राज्यात कोरोना प्रतिबंधासाठी लॉकडाऊन पुकारण्यात आल्याने विद्यापीठाच्या सर्व परीक्षा ऑनलाईन होणार आहेत, असे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी गुरुवारी जाहीर केले. राज्यातील सर्व विद्यापीठांच्या कुलगुरूंसोबत परीक्षांसंदर्भात बैठक झाली. त्यावेळी तेराही अकृषी विद्यापीठांच्या परीक्षा ऑनलाईन घेण्याचे निश्चित झाले. या परीक्षा ऑनलाईन व ऑफलाईन सुरू होत्या. मात्र कडक निर्बंधांमुळे आता टीवायसह उर्वरित सर्व परीक्षा ऑनलाईन घेण्यात येतील, असा निर्णय झाल्याचे सामंत यांनी सांगितले.



**एकही विद्यार्थी वंचित राहणार नाही**

कोरोनाच्या कठीण परिस्थितीमुळे हा निर्णय घेण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना निर्माण होणाऱ्या तांत्रिक अडचणींची पूर्तता करण्याबाबत कुलगुरुंना विनंती करण्यात आली आहे. या परीक्षांपासून कोणताही विद्यार्थी वंचित राहणार नाही याची विद्यापीठ प्रशासनाने दक्षता घ्यावी.

**-उदय सामंत, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री**

**कोरोना प्रादुर्भावामुळे निर्णय**

राज्य सरकारने लॉकडाऊन संदर्भातील नियम अधिक कडक केले आहेत. याची अंमलबजावणी १ मे रोजी सकाळी ७ पर्यंत आहे. त्यामुळे इतर व्यवहाराप्रमाणे परीक्षांचे नियोजन विस्कळीत होण्याची शक्यता होती. त्यामुळे राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांच्या परीक्षा ऑनलाईन घेतल्या जाणार आहेत. याआधी ऑनलाईन व ऑफलाईन असे पर्याय दिले होते. परंतु आता विद्यापीठाच्या उर्वरित सर्वच परीक्षा ऑनलाईन होणार असल्याचे या निर्णयानंतर स्पष्ट झाले आहे.

**विद्यापीठांमार्फत लसीकरण**

उच्च शिक्षण विभागातील कर्मचारी अत्यावश्यक सेवेत गणला जावा, अशी विनंती मुख्यमंत्र्यांना करण्यात येणार आहे. यामुळे निकाल लवकर लागेल. राज्यातील ३७ लाख कॉलेज विद्यार्थ्यांचे लसीकरण विद्यापीठांमार्फत करण्याचा विचार आहे. १८ ते २५ वयोगटातील हे विद्यार्थी आहेत. त्यामुळे त्यांचे लसीकरण होणे आवश्यक असल्याचे सामंत यांनी सांगितले.



विद्यार्थ्यांच्या लसीकरण मोहिमेत एनसीसी व एनएसएसच्या विद्यार्थ्यांची मदत घेण्याचा विचार आहे. हे विद्यार्थी लसीकरण मोहिमेत स्वयंसेवक म्हणून सहभागी होतील. रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात ऑक्सिजन कमतरता नाही. लस व रेमडेसिवीरचे समान वाटप केंद्राने करावे, असेही त्यांनी सांगितले.

**कायद्याच्या प्रवेशासाठी मुदतवाढ**

कायदाच्या विद्यार्थ्यांना नवीन प्रवेशासाठी मुदत वाढवून देणार आहोत. कोविडचे संकट कमी झाल्यावर प्राध्यापकांची भरतीही करण्यात येणार आहे, असे सामंत यांनी यावेळी नमूद केले.

## नेट परीक्षा पुढे ढकलली

**पुणे :** वरिष्ठ महाविद्यालयात सहायक प्राध्यापकपदाची राष्ट्रीय पात्रता परीक्षा (युजीसी–नेट) कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे लांबणीवर टाकण्याचा निर्णय राष्ट्रीय परीक्षा मंडळाने (एनटीए) घेतला आहे. नवी तारीख परीक्षेपूर्वी किमान पंधरा दिवस आधी जाहीर करण्यात येईल, असे स्पष्ट केले. २ ते १७ मे दरम्यान देशभरातील केंद्रांवर ही परीक्षा घेण्यात येणार होती. कोरोनामुळे सीबीएसईने दहावीची परीक्षा रद्द केली, तर बारावीची परीक्षा पुढे ढकलली. अन्य मंडळांनीही नियोजित परीक्षा स्थगित केल्या. त्यामुळे नेट परीक्षेबाबत प्रश्न निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर एनटीएने परीक्षा पुढे ढकलण्यात आल्याचे मंगळवारी परिपत्रकाद्वारे जाहीर केले.

लोकमत

# प्रवेश परीक्षाही ऑनलाइन

कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत असल्याने प्रथम वर्षाच्या परीक्षा आणि एम. फिल., पीएच.डी. च्या प्रवेश परीक्षा ऑनलाइन घेण्याची शिफारस आमच्या समितीने विद्यापीठाला केली आहे. प्रवेश परीक्षा या देखरेखीमध्ये घेण्यात याव्यात, असे विद्यापीठाला सुचविले असल्याची माहिती डॉ. मेघा गुळवणी यांनी दिली.

- संलग्नित महाविद्यालये : २७६
- प्रथम वर्ष विद्यार्थी संख्या : ६२८००
- एम. फिल., पीएच.डी. प्रवेश परीक्षा विद्यार्थी संख्या : ५५०

Kolhapur Main
Page No. 3 Apr 23, 2021
Powered by: erelego.com

# शिवाजी विद्यापीठाच्या ७९,५०० विद्यार्थ्यांना दिलासा

**(पान १ वरून)** प्रथम वर्षाच्या ६२ हजार ५०० विद्यार्थ्यांच्या परीक्षा आता ऑनलाईन पद्धतीने महाविद्यालय स्तरावर घेतल्या जाणार आहेत.

पदवी स्तरावरील द्वितीय व तृतीय वर्ष, दूरशिक्षण विभाग तसेच पदव्युत्तरच्या सत्र २, ३, ४ च्या सुमारे १७ हजार विद्यार्थ्यांच्या परीक्षादेखील ऑनलाईन होणार आहेत. याबाबतची सूचना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर होईल, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी दिली.

तरूण भारत

# विद्यापीठाची परीक्षा सुरळीत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत ऑक्टोबर–नोव्हेंबर २०२०च्या हिवाळी परीक्षा ऑनलाईन पध्दतीने सुरू आहेत. पदवी व पदव्युत्तर आणि व्यवसायिक अभ्यासक्रमाच्या ३० हजार ३१० विद्यार्थ्यांपैकी २९ हजार ५६३ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा आहे. विद्यार्थ्यांना येणाऱ्या तांत्रिक अडचणीचे निराकरण निराकरणही तातडीने केले जात आहे. यामध्ये बी. एस्सी–बायोटेक, बी.एस्सी. आयटी, बी. एस्सी. शुगर टेक, बी. एस्सी. फुड प्रोसेसिंग ॲन्ड पॅक, बी. एस्सी. कॉम्प्युटर सायन्स, बी. एस्सी., बी. बी. ए., बी. सी. ए., बी. एस्स. डब्ल्यू., बी. आय. डी., बी. डी. एफ. सी., बी. एफ. टी. एम., बी. होक., एम. ए., बी. डी. एस., एम. लिप., एम. एस. डब्ल्यू., एम. कॉम., मास्टर ऑफ व्हॅल्युएशन, एम. सी. ए., एम. एस्सी. नॉनो सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजी, एम. ए./ एम. एस्सी. भुगोल, एम. एस्सी., बी. एस्सी., बी. ए. या अभ्यासक्रमाचा समावेश आहे.

# २९ हजार विद्यार्थ्यांनी दिली ऑनलाईन परीक्षा

कोल्हापूर : विद्यापीठ परीक्षेअंतर्गत गुरुवारी विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या. ३० हजार ३१० पैकी २९ हजार ५६३ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने परीक्षा दिली. शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील ऑक्टोबर-नोव्हेंबरच्या परीक्षा ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने २२ मार्चपासून सुरू झाल्या आहेत. गुरुवारी बी. एस्सी.-बायो टेक, बी. एस्सी.-आयटी, बी. एस्सी.-शुगरटेक, बी. एस्सी.-संगणकशास्त्र, बीसीएस, बीबीए, बीएसडब्ल्यू, बीएलडी, बीएफटीएम, एमसीए, एम.ए., बीडीएस, एम. एस्सी. या अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीत पार पडल्या.